**श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी**
पो. शिर्डी ता. राहाता जि. अहमदनगर पिन कोड नं. ४२३ १०९
दुरध्वनी क्रं. (०२४२३) २५८७७१/२५८७७२ फॅक्सः २५८७७०

जा.नं.एसएसएस/वशी-खरेदी/ 886 /२०२२

दिनांक- 28 MAY 2022

प्रति,
मे.-----------------------------------------------
-----------------------------------------------
-----------------------------------------------
-----------------------------------------------

विषयः- मगज बी, भाजके पोहे व सुतळी (जुन २०२२ ते सप्टेंबर २०२२) या कालावधीकरीता... दरपत्रक मागणी..

आपणास कळविण्यात येते की, श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी करीता सोबत परिशिष्टात नमूद तपशीलाप्रमाणे मगज बी, भाजके पोहे व सुतळी खरेदी दरपत्रक पध्दतीने खालील अटी-शर्तीस अनुसरून करावयाची आहे. त्यास अनुसरून आपण आपले दर सोबतचे परिशिष्टात भरून परिशिष्ट आपले लेटरहेडवरील कव्हरींग पत्रासह सादर करावे.

**अटी/शर्ती-**

१. दरपत्रकासोबत अदयावत दुकान नोंदणी दाखला/ स्थानिक स्वराज्य संस्थेचा दाखला/तत्सम शासकीय परवाना, GST नोंदणी दाखला अगर GST Online Registration Receipt, FSSAI लायसन्स व पॅन कार्डची झेरॉक्स प्रत जोडावी.
२. दरपत्रकासोबत स्वतंत्रपणे मगज बी, भाजके पोहे व सुतळी यांचे प्रत्येकी ५०० ग्रॅम वजनाचे चांगल्या दर्जाचे नमुने दयावेत.
३. नमुने नसलेली दरपत्रके विचारात घेतली जाणार नाहीत.
४. दरपत्रकासोबत सादर केलेल्या नमुन्याप्रमाणे माल पुरवावा लागेल.
५. सोबतचे परिशिष्ठामध्ये आपले दर **सर्व कर, GST, GST-TDS, पॅकिंग व फॉरवर्डींग, वाराई तसेच शिर्डी येथील श्री साईबाबा संस्थानचे भांडार विभागात पोहचचे वाहतूक खर्चासह प्रती क्विंटलचे दर सादर करावेत.**
६. पुरवठा शिर्डी येथील श्री साईबाबा संस्थानचे भांडार विभागामध्ये करावा लागेल.
७. आपले दरपत्रक मंजूर झालेस मालाचा पुरवठा करावयाची हमी म्हणून एकुण पुरवठा आदेश रकमेच्या ३ % इतकी रक्कम सुरक्षा अनामत रक्कम म्हणून श्री साईबाबा संस्थानकडे ठेवावी लागेल. ही सुरक्षा अनामत रक्कम मालाचा व्यवस्थितरित्या पुरवठा केलेनंतर व पुरवठा कालावधी संपलेनंतर परत केली जाईल. सदर रकमेवर कुठल्याही प्रकारचे व्याज मिळणार नाही.
८. दरपत्रक मंजूर झालेवर रू.१००/- मात्रचे स्टॅम्प पेपरवर त्वरीत करारनामा नोटरी करून देणे बंधनकारक राहील. करारनाम्याची नोटरी फी आपणास आदा करावी लागेल.
९. श्री साईबाबा संस्थानची सदर मागणी ही अंदाजित असल्यामुळे पुरवठा कालावधीत अगर त्यानंतरही पुढील वर्षाची खरेदी संबंधीत प्रक्रिया पुर्ण होईपावेतो आवश्यकतेनुसार मंजूर केलेल्या परिमाणापेक्षा २५ टक्केपर्यंत जादा मालाची मागणी श्री साईबाबा संस्थानकडून झाल्यास तीचा पुरवठा मान्य दरानेच करणे संबंधित पुरवठाधारकावर बंधनकारक राहील.
१०. पुरवठा आदेश दिल्यानंतर पुरवठा आदेशात नमूद मालाचा पुरवठा हा एकदम करावयाचा नसून श्री साईबाबा संस्थानचे गरजेप्रमाणे दरमहा मागणी चलन पुरवठादारास पाठविण्यात येईल. त्यामध्ये नमूद परिमाण इतकाच

मालाचा पुरवठा करावा लागेल. पुरवठा आदेशात नमूद केलेले परिमाण (Quantity) ही अंदाजे रहाणार असून भक्तांच्या संख्येनुसार प्रत्यक्ष मागणी अवलंबून रहाणार आहे. त्यामुळे दरपत्रकात किंवा पुरवठा आदेशात नमूद परिमाण (Quantity) खरेदी करणे श्री साईबाबा संस्थानवर बंधनकारक रहाणार नाही.

११. पुरवठा आदेशातील वर्णनाप्रमाणेच मालाचा पुरवठा करावा व त्याप्रमाणेच बिल सादर करावे.

१२. पुरवठा करीत असलेला माल श्री साईबाबा संस्थानकडून Randomly Sample घेऊन स्विकारली जाते. तथापी सदर माल स्विकारलेनंतरही एखादा बॉक्स, लॉट खराब आढळल्यास तो स्वखर्चाने बदलून द्यावा लागेल.

१३. श्री साईबाबा संस्थानने करुन घेतलेले लॅब तपासणीमध्ये पुरविलेल्या मालाचे रिपोर्ट FSSAI Standards नुसार नसल्यास सदर माल बदलून द्यावा लागेल. त्यादरम्यान श्री साईबाबा संस्थानला बाहेरुन माल विकत घ्यावा लागल्यास जादा आलेल्या खर्चाची रक्कम अधिक पुरविलेल्या मालाच्या किंमतीच्या २ ते ५ टक्के दंड देय असलेल्या कुठल्याही बील रकमेतून/सुरक्षा अनामत रकमेतून वसूल करण्यात येईल.

१४. आपण पुरविलेल्या मालाचा लॅब रिपोर्ट सलग तीन वेळेस FSSAI Standards नुसार न आलेस आपणावर श्री साईबाबा संस्थानकडून उचित कारवाई करणेबाबत निर्णय घेतला जाईल. याबाबत आपली कुठलीही तक्रार ऐकून घेतली जाणार नाही.

१५. आपण पुरविलेला माल श्री साईबाबा संस्थानने नाकारला व त्यामुळे पुढील कालावधीसाठी श्री साईबाबा संस्थानला बाजारभावाने दुसरीकडून माल खरेदी करावा लागल्यास त्यासाठी जादा आलेल्या खर्चाची भरपाई सुरक्षा अनामत रकमेतुन अथवा श्री साईबाबा संस्थानकडून देय असलेल्या इतर बिलातुनही वसुल केली जाईल.

१६. शासन नियमानुसार आवश्यक असलेल्या कर कपाती बिलातून करण्यात येतील.

१७. पुरवठा आदेशातील मसाले मुदतीत पुरविली नाही तर खालीलप्रमाणे दंडात्मक कारवाई करण्यात येईल.

| | |
|---|---|
| अ) पुरवठा न केलेल्या मसाल्यांची किंमत रु.२.०० लाखापेक्षा कमी असल्यास | प्रती आठवडा ०.५० % दराने जास्तीत जास्त १० % पर्यंत |
| ब) पुरवठा न केलेल्या मसाल्यांची किंमत रु.२.०० लाख किंवा त्यापेक्षा जास्त असल्यास | प्रती आठवडा ०.५० % दराने जास्तीत जास्त ५ % पर्यंत |

१८. माल पुरविणेचा आदेश दुरध्वनीवरुन अथवा मागणी चलनात दिलेले Schedule प्रमाणे अगर चलन दिलेपासून जास्तीत जास्त १० दिवसांचे आत पुरवठा न झाल्यास अगर योग्य प्रतीचा नसल्यामुळे तो नाकारला गेल्यास श्री साईबाबा संस्थानची अडचण होऊ नये म्हणून श्री साईबाबा संस्थानला बाजारभावाने आवश्यक तितका किंवा दिलेल्या आदेशा इतका माल दुसरीकडून खरेदी करण्याची मुभा राहील. अशा खरेदी केलेल्या मालासाठी जादा लागलेल्या रकमेची (फरकाची) भरपाई पुरवठाधारकाने श्री साईबाबा संस्थानला करुन दयावयाची आहे. सदरची भरपाई सुरक्षा अनामत रकमेतून अगर पुर्वीच्या/नंतरच्या आलेल्या बिलातून वसुल करण्याचा अधिकार संस्थान प्रशासनाला राहील.

१९. दरपत्रकातील मंजूर दराने मालाचा पुरवठा करणे बंधनकारक आहे. मंजूर दरामध्ये कोणत्याही कारणास्तव दरवाढ मागण्याचा अधिकार पुरवठाधारकास असणार नाही अथवा अशा प्रकारची दरवाढ दिली जाणार नाही. पुरवठाधारकाने मालाचा पुरवठा करावयाचे नाकारल्यास अथवा पुरवठा न केल्यास श्री साईबाबा संस्थानला बाजारभावाने अथवा फेरनिविदा मागणी करुन खरेदी करावी लागल्यास जादा येणा-या खर्चाची नुकसान भरपाई पुरवठाधारकाकडून वसुल केली जाईल. तसेच याबाबत संस्थान प्रशासनाने घेतलेले निर्णयाप्रमाणे उचित कारवाई करण्यात येईल. याबाबत पुरवठाधारकाची कुठलीही तक्रार ऐकुन घेतली जाणार नाही.

२०. पुरवठा कालावधीमध्ये एखादी आपत्ती/ नैसर्गिक आपत्तीमुळे (अशी आपत्ती की जी दरपत्रकधारकाच्या नियंत्रणाबाहेर असेल. उदा.युद्ध, अतिवृष्टी, दुष्काळ, अपहरण, घातपात, रोगराई, संप, स्फोट, टाळेबंदी, भूकंप वगैरे) पुरवठाधारक मालाचा पुरवठा करु शकला नाही व तसे पुरवठाधारकाने श्री साईबाबा संस्थानला त्वरीत लेखी कळविले तर याबाबत योग्य तो निर्णय परिस्थितीनुरुप घेण्यात येईल. तथापि सदर तरतूद ही फक्त पुरवठा करण्यात

झालेला विलंब क्षमापित करण्याइतपत मर्यादित असून उपरोक्त परिस्थितीत मंजूर दरापेक्षा बाजारात भाववाढ झाल्यास त्यासाठी लागू राहणार नाही. पुरवठादाराला बाजारात भाववाढ झाली तरीही मंजुर दराने पुरवठा करणे बंधनकारक आहे. पुरवठादाराने पुरवठा न केल्यास सुरक्षा अनामत रक्कम जप्त करण्यात येईल अगर संस्थान प्रशासन जो निर्णय घेईल तो पुरवठाधारकावर बंधनकारक राहील. याबाबत संबंधिताची कुठलीही तक्रार ऐकून घेतली जाणार नाही.

२१. सदर दरपत्रकाचा वैधता कालावधी दरपत्रकाच्या अंतिम तारखेपासून ९० दिवसांचा राहील.

२२. सदर पुरवठा कालावधी जुन २०२२ ते ३० सप्टेंबर २०२२ पर्यंत राहील याचा दर भरतांना दरपत्रकधारकाने विचार करावा.

२३. शिर्डी संस्थान हे धर्मदाय संस्था असल्याने दरात जास्तीत जास्त सवलत देणेस विनंती.

२४. कोणतेही दरपत्रक स्विकारणे अथवा नाकारणे अगर सर्व दरपत्रके नाकारणे याबाबतचा अधिकार श्री साईबाबा संस्थान प्रशासनाने राखून ठेवला आहे. त्याची कारणे देणे संस्थान प्रशासनावर बंधनकारक राहाणार नाही.

२५. सिलबंद पाकिटातील दरपत्रक संस्थानचे आवक विभागामध्ये विहित मुदतीत जमा करावेत. पाकिटावर **“मगज बी, भाजके पोहे व सुतळी खरेदी दरपत्रक”** असा स्पष्ट उल्लेख असावा. मुदतीनंतर आलेल्या दरपत्रकांचा विचार केला जाणार नाही.

२६. माल पुरविलेनंतर साधारण ३० दिवसात बील आदा करण्याचा प्रयत्न राहिल. सदर पुरवठयापोटी श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्थेकडून आगाऊ रक्कम (ॲडव्हान्स) दिली जाणार नाही.

२७. सदरील व्यवहाराबाबत वाद निर्माण झाल्यास तो राहाता/कोपरगांव कोर्टाचे न्यायकक्षेत राहिल.

२८. उपरोक्त शर्ती व अटीत काही बदल, सुधारणा करणे वा जादा अटी/शर्ती विहीत करण्याचा अधिकार श्री साईबाबा संस्थान प्रशासनाने राखून ठेवलेला आहे. दरपत्रकधारकाची कोणतीही अट/अटी श्री साईबाबा संस्थान प्रशासनावर बंधनकारक राहणार नाही, अशा निविदा विचारात घेतल्या जाणार नाहीत.

२९. दरपत्रक सादर करण्याचा अंतीम दिनांक १४ / ६ /२०२२.

(भाग्यश्री बानायत, भा.प्र.से)
मुख्य कार्यकारी अधिकारी
श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी

## भाजके पोहे, मगज बी व सुतळी खरेदी दरपत्रक परिशिष्ट

| अ.नं | मालाचा तपशिल | अंदाजे मागणी | दर प्रती क्विंटल GST व सर्व समावेशक खर्चासह | एकुण रक्कम |
|---|---|---|---|---|
| १ | भाजके पोहे- चांगल्या प्रतीचे | १६ क्विंटल | | |
| २ | मगज बी- चांगल्या प्रतीचे | १ क्विंटल | | |
| ३ | सुतळी- थ्री प्लाय | २ क्विंटल | | |

दरपत्रकधारकाची सही व शिक्का